# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४

महत्वाचे

क्र. कोविमं./ उमा.गोप./2897
दिनांक- १७ /०१/२०२३

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२३ अंतर्गत व बहिस्थ परीक्षक नियुक्तीबाबत.**

**संदर्भ**- क्र. कोविमं/ए-२/उ.मा./ फेब्रु-मार्च २०२३/२८६०/ दि.१३/०१/२०२३ चे ऑनलाईन परिपत्रक.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा **फेब्रु-मार्च २०२३** परीक्षेच्या प्रात्यक्षिक/ तोंडी/ प्रकल्प/ अंतर्गत मुल्यमापन व श्रेणी परीक्षा **दिनांक ०१/०२/२०२३ ते दिनांक २०/०२/२०२३** या कालावधीत आयोजित केल्याचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. फेब्रु-मार्च २०२३ परीक्षेसाठी मंडळामार्फत गणित/ भौतिकशास्त्र / रसायनशास्त्र / जीवशास्त्र या विषयासाठी अंतर्गत / बहिस्थ परीक्षक तसेच आय.टी. विषयासाठी बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे व पूर्वीप्रमाणे बायफोकल व एम.सी. व्ही.सी नवीन अभ्यासक्रम या विषयासाठी अंतर्गत / बहिस्थ परीक्षकांची नेमणूक मंडळामार्फत करण्यात आलेली आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिकवत असलेल्या विषयाच्या व ज्या विषयासाठी मंडळामार्फत अंतर्गत / बहिस्थ परीक्षक नेमले आहेत त्यांची नावे सोबत संगणीकृत यादी द्वारे देण्यात आलेली आहेत.

अ) **As A Internal-** म्हणून जी नावे दिलेली आहेत ते शिक्षक आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे अंतर्गत (Internal) परीक्षक म्हणून काम पाहतील. त्यामध्ये ज्या विषयासाठी नावे प्राप्त झालेली नाहीत, अशा विषयासाठी **College Teacher** असे नमूद केले आहे.त्यानुसार आपण आपल्या स्तरावर विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची अंतर्गत परीक्षक म्हणून नियुक्ती करावी.

ब) **Going To As An External -** आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नावे दर्शवून त्यांच्यासमोर ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ते बहिस्थ **(External)** परीक्षक म्हणून परीक्षा घेणार आहेत त्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, पत्ता दूरध्वनी क्र. देण्यात आलेले आहेत.

क) **Coming From As An External-** आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बहिस्थ **(External)** परीक्षक म्हणून येणारे शिक्षक यांची कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक व विषय क्रमांक, परिक्षकाचे नाव व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक देण्यात आलेले आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे नियुक्त्या केलेल्या आहेत. आपण संबंधित परिक्षकांशी तसेच संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधून जेणेकरुन दोन्ही कनिष्ठ महाविद्यालयांची परीक्षा नियोजनाबाबत अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच निर्धारित वेळेत परीक्षेच्या बॅचेस तयार करुन नियोजन करावे. तसेच बायफोकल व MCVC या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावी.

मंडळामार्फत या विषयांसाठी आपल्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ०१ अंतर्गत + ०१ बहिस्थ अथवा उपलब्ध माहितीतील शिक्षकांच्या या प्रमाणे नियुक्त्या केलेल्या आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या ज्यादा असल्यास व निर्धारित वेळेत परीक्षा पूर्ण करुन घेणे आवश्यक असल्यामुळे एका अंतर्गत/ बहिस्थ परिक्षकांकडून परीक्षा घेणे शक्य होत नसल्यास तसेच **उपरोक्त विषयास मंडळामार्फत अंतर्गत व बहिस्थ परिक्षकांची नियुक्ती झाली नसल्यास आपल्या स्तरावर अंतर्गत / बहिस्थ परीक्षकांची नजिकच्या कनिष्ठ महाविद्यालयामधील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा निर्धारित वेळेत पूर्ण करुन घेण्यात यावी.** तथापि ही कार्यवाही करताना सदर बाब मंडळास लेखी स्वरूपात निदर्शनास आणावी. शक्य असल्यास मंडळाची मान्यता घ्यावी.

तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात सुविधेबाबत बहिस्थ परीक्षकांनी सादर करावयाचे गोपनीय अहवालाचे प्रपत्र प्रात्यक्षिक परीक्षेच्या साहित्यासोबत आपणांस देण्यात येणार आहे. तो अहवाल संबंधित बहिस्थ परीक्षकांकडे देण्यात यावा व तो गोपनीयरित्या भरुन स्वतंत्र बंद पाकिटात व पाकिटावर विषयाचे नाव व आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक व गोपनीय असे लिहून पाकिट बंद करुन त्यावर बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी घ्यावी व ते पाकिट आपल्याकडे जमा करुन घ्यावे व सदरचे गोपनीय अहवालाचे पाकिट गुणपत्रिकेच्या पाकीटात भरुन मंडळास सादर करावे.

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.